'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू


पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई Email ID : shabdarutu@gmail.com

### शरद पवार यांची चौकशी करा : आ. प्रशांत बंब


**मुंबई** : निवडणुकीमध्ये १६० आमदार निवडून देण्याच्या वक्तव्याप्रकरणी शरद पवार यांची चौकशी करावी, अशी मागणी भाजप आमदार प्रशांत बंब यांनी केली आहे. अनके वर्षानंतर गावात गेल्यावर लोकांना नावानिशी ओळखणाऱ्या शरद पवारांना भेटायला आलेल्या दोन व्यक्तींची नावं आठवत नाहीत. हे दोन लोक देशद्रोही आहेत. माझा विश्वास नाही की त्यांना त्यांचे नाव आणि पत्ता आठवत नाहीत. लोकसभेत असाच प्रकार तर नसेल केला. आता सौदा जमला नसेल.

✻ वर्ष २ रे ✻ अंक ४६ वा ✻ रविवार दि. १७ ऑगस्ट २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✻ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

**नवी कोरी पुस्तकं**




**जोखमीच्या सावल्या**
: लेखकाचे नाव :
**रंगनाथ पठारे**
किंमत रु. : ४४०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**चिंचेवरलं भूत आणि इतर गोष्टी**
: लेखकाचे नाव :
**जितेंद्र कुवर**
किंमत रु. : २००/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

## देशभरात मातृभूमीचं जयगान गायलं जात आहे : मोदी

**नवी दिल्ली** : ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्यावरुन देशवासियांना संबोधित केलं. लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवून पंतप्रधान मोदींनी भारतवासियांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर संविधान निर्मात्यांना वंदन केलं. तर ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी झालेल्या शूरवीरांनाही सलाम दिला. पहलगाममध्ये सीमेपलिकडून येणाऱ्या दहशतवाद्यांनी धर्म विचारुन मारले. त्यांना सैनिकांना धडा शिकवला.


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे :

देशभरात आज मातृभूमीचं जयगान गायलं जात आहे, संपूर्ण देश तिरंगामय, १४० कोटी देशवासियांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा

डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांसारख्या योद्धांना नमन

हंसा मेहता यासारख्या नारीशक्तीचं योगदान कमी नव्हतं

**(पान २ वर)**




१५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन सलग १२ व्या वेळी तिरंगा फडकवला.

# राज्यात पावसाचे धूमशान

### कमी दाबाच्या पट्ट्यामुळे आठवडाभराचा मुक्काम

**पुणे** : बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे पुढील सात दिवस देशभरात अतिवृष्टीचा अंदाज आहे. वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचं आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या इशाऱ्यानुसार पुढील सात दिवस गोवा, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये अतिमुसळधार पावसाची शक् आहे. तर २० ते २२ ऑगस्टदरम्यान बिहारमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. १९, २१ आणि २२ ऑगस्ट रोजी झारखंडमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे. हवामान विभागाकडून पुढील पाच दिवस झारखंड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, छत्तीसगड, सिक्कीम, उत्तराखडं, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. गेल्या



दोन दिवसांपासून महाराष्ट्राला पावसाने झोडपून काढले आहे, गेल्या दोन दिवसांपासून राज्यभरात मुसळधार पाऊस सुरू असून, नदी नाल्याला पूर आला आहे. दरम्यान हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पुढील चार ते पाच दिवस राज्यामध्ये अशीच परिस्थिती राहणार आहे, हवामान विभागाच्या या नव्या इशाऱ्यामुळे चिंता वाढली आहे. हवामान विभागाकडून महाराष्ट्रात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकण आणि विदर्भात जोरदार पावसाची शक्यता आहे, तसेच पश्चिम महाराष्ट्रात देखील पावसाचा जोर वाढू शकतो असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्यात शुक्रवारी रात्रीपासूनच जोरदार पाऊस सुरू आहे. **(पान २ वर)**

## महाराष्ट्रात दहिहंडी उत्साहात साजरी

### एका गोविंदाचा मृत्यू, दोन गंभीर


**मुंबई** : शहरातील दहीहंडी उत्सव यंदा देखील मोठ्या उत्साहात साजरा झाला. वरळी, घाटकोपर, कांदिवली, मागाठाणे, मुलुंड, दादर, बोरिवलीसह ठाण्यातील विविध भागांमध्ये सकाळपासूनच गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडली. यंदा सर्वात विशेष ठरले जय जवान गोविंदा पथकचे कामगिरी. या पथकाने एकाच दिवसात तीन वेळा १० थरांची दहीहंडी उभारून विश्वविक्रमाची हॅट्रिक साधली. पहिल्या थरात त्यांनी सुरुवात केली, दुसऱ्या थरात उत्साह दुपटी केला आणि तिसऱ्या थरात अखेरच्या थराने इतिहास रचला. परंतु उत्साहाच्या या रंगात काळी सावली ओढली. शहरभरात दहीहंडीच्या धडाक्यात अनेक गोविंदा जखमी झाले. आतापर्यंत ९५ जण जखमी, तर एक गोविंदा मृत्यूमुखी पडला आहे.

मात्र, दहीहंडीच्या उत्साहाला गालबोटही लागले. मुंबईतील विविध ठिकाणी गोविंदांच्या **(पान २ वर)**

### संक्षिप्त

#### आम्ही नॉनव्हेज खाणारच : ठाकरे

**मुंबई ।** १५ ऑगस्ट दिनी मांसविक्री बंदी संदर्भातील निर्णयावर आ.



आदित्य ठाकरे यांनी विरोध दर्शवित आपली भूमिका मांडली. कल्याण डोंबिवलीच्या महापालिका आयुक्तांचे निलंबन केले पाहिजे, कारण व्हेज की नॉनव्हेज हा मुद्दा त्यांचा नाही. स्वातंत्र्यदिनी आम्ही काय खायचं हे आमचं स्वातंत्र्य आहे, आम्ही निश्चितच नॉन व्हेज खाणार, आमच्या घरी नॉनव्हेज खाल्लं जातंय. आमच्या घरी नवरात्रीमध्ये माशांचा नैवेद्य असतो, आमची ती परंपरा आहे, असेही आमदार आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट केले.

## 'मांसविक्री बंद'चा निर्णय सरकारचा नाही!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा खुलासा

**मुंबई** : स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी अर्थात १५ ऑगस्टला मांसविक्री बंद ठेवण्याचा



कोणताही निर्णय राज्य सरकारने घेतला नसल्याचा खुलासा मुख्यमंत्री फडणवीस यांनी बुधवारी केला. १९८८ मध्येच तत्कालीन काँग्रेस सरकारने याबाबतचा निर्णय घेत या दिवशी कत्तलखाने बंद ठेवण्याचा अधिकार महापालिकांना **(पान २ वर)**


#### आहारावर बंदी योग्य नाही : उपमुख्यमंत्री

"कोकणात आपण गेलो तर प्रत्येक भाजीत सुकट टाकतात. त्यामुळे अशी बंदी घालणे योग्य नाही. भावनिक मुद्दा असेल तर त्या काळासाठी बंदी घातली तर लोक समजू शकतात. परंतु, १५ ऑगस्ट दिनी महाराष्ट्रात बंदी घातली तर योग्य नाही, मी याबाबत माहिती घेतो'' असे म्हणत अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे.

## त्या ६५ लाख लोकांची नावं जाहीर करा

### आडमुठ्या निवडणूक आयोगाला सर्वोच्च धक्का

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयानं बिहारमध्ये सुरु असलेल्या मतदार यादीच्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिशन (एसआयआर) प्रकरणात निवडणूक आयोगाला महत्त्वाचे आदेश दिले आहेत. निवडणूक आयोगानं एसआयआरच्या अंतर्गत ६५ लाख मतदारांची नावं मतदार यादीतून वगळली होती. ही नावं आम्ही शेअर करु शकत नाही, असं आयोगानं न्यायालयाला सांगितलं होतं. पण आज न्यायालयानं निवडणूक आयोगाला या प्रकरणात महत्त्वाचे आदेश दिले आहेत. वगळण्यात आलेली ६५ लाख नावं १९ ऑगस्टपर्यंत सार्वजनिक करा, असे स्पष्ट आदेश न्यायालयाकडून देण्यात आले आहेत.



आडमुठी भूमिका घेणाऱ्या निवडणूक आयोगाला हा मोठा धक्का मानला जात आहे. बिहारमध्ये एसआयआरच्या अंतर्गत ६५ लाख मतदारांची नावं मतदार यादीतून वगळली. यावरुन बराच गदारोळ झाला. प्रकरण सर्वो च्च न्यायलयात गेलं. यावरुन आता सर्वो च्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला महत्त्वाचे आदेश दिले आहेत. वगळण्यात आलेली ६५ लाख नावं सार्वजनिक करा. त्या मतदारांची नावं **(पान २ वर)**

### पाकमधील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करणाऱ्या

## ९ लढाऊ वैमानिक-अधिकाऱ्यांना वीर चक्र

**नवी दिल्ली** : स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला, ऑपरेशन सिंदूरमध्ये शौर्य आणि धाडस दाखवणाऱ्या ७० सशस्त्र दलाच्या जवानांना शौर्य पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली आहे. हवाई दलाच्या ३६ जवानांना शौर्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. ९ हवाई दलाच्या अधिकाऱ्यांना वीर चक्राने सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानमधील मुरीदके आणि बहावलपूरमधील दहशतवादी अड्डे नष्ट करणाऱ्या लढाऊ वैमानिकांचा समावेश आहे. वीर चक्र हे युद्धादरम्यान दिले जाणारे तिसरे सर्वोच्च शौर्य पदक आहे.

नऊ सैनिकांना वीर चक्र प्रदान करण्यात आले. ग्रुप कॅप्टन रणजित सिंग सिद्धू, मनीष अरोरा, अनिमेश पटणी, कुणाल कालरा, विंग कमांडर जॉय चंद्र. स्कॉड्रन लीडर सार्थक कुमार, सिद्धांत सिंग, रिजवान मलिक, फ्लाइट लेफ्टनंट अर्शबीर सिंग ठाकूर यांचा समावेश आहे.

त्याच वेळी, बाबुसेनेचे उपप्रमुख एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी, बेस्टर्न एअर कमांडर एअर मार्शल जितेंद्र मिश्रा आणि डीजी एअर ऑपरेशन्स एअर मार्शल अवधेश भारती यांच्यासह चार हवाई दल अधिकाऱ्यांना सर्वोत्कृष्ट युद्ध सेवा पदक प्रदान करण्यात आले.

भारतीय लष्करातील १८ सैनिकांना शौर्य पदक प्रदान करण्यात आले आहे. भारतीय लष्कराच्या एका




अधिकाऱ्याने सांगितले की, २ वरिष्ठ भारतीय लष्करी अधिकाऱ्यांना सर्वोत्तम युद्ध सेवा पदक प्रदान करण्यात आले आहे. ४ कीर्ती चक्र, ४ वीर चक्र आणि ८ शौर्य चक्र प्रदान करण्यात आले आहेत.

**१६ बीएसएफ जवानांना शौर्य पदक**

सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) १६ सैनिकांना शौर्य पदक प्रदान करण्यात आले आहे. बीएसएफ ही देशाची पहिली संरक्षण रिषा आहे, जी २२९० किमी लांबीच्या भारत-पाकिस्तान सीमा आणि पश्चिम भागातील नियंत्रण रेषेवर (एलओसी) देखरेख आणि संरक्षण करते. या कारवाईदरम्यान बीएसएफचे दोन सैनिक शहीद झाले आणि सात जखमी झाले. याशिवाय पोलिस आणि निमलष्करी दलाच्या कर्मचाऱ्यांनाही पदके देण्यात आली आहेत. यामध्ये जम्मू-काश्मीर पोलिसांकडून १२८, सीआरपीएफकडून २० आणि छत्तीसगड पोलिसांकडून १४ पदकांचा समावेश आहे.

**केंद्रीय राज्य दलातील १०९० पोलिसांना सेवा पदके प्रदान**

केंद्र सरकारने केंद्रीय आणि राज्य दलातील १०९० पोलिसांना सेवा पदके देण्याची घोषणा केली आहे. गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार, २३३ पोलिसांना शौर्य पदके, ९९ पोलिसांना राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदके आणि ७५८ पोलिसांना उत्कृष्ट सेवा पदके प्रदान करण्यात आली आहेत. यामध्ये अग्निशमन सेवा, गृहरक्षक दल, नागरी संरक्षण आणि सुधार सेवा कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे.

# थोरातांनी काय कमी केलं, तुम्ही त्यांना का पाडलं?

## खा. संजय राऊत यांचा संगमनेरकरांना सवाल

**संगमनेर :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी गुरुवारी (दि.१४) काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मतदारसंघात हजेरी लावली. यावेळी संजय राऊत यांनी तुम्हाला बाळासाहेब थोरातांनी काय कमी केलं, त्यांना तुम्ही विधानसभेला का पाडलं, असा थेट सवाल संगमनेरकरांना केला. यावेळी बाळासाहेब थोरात हे सुद्धा मंचावर उपस्थित होते. बाळासाहेब थोरातांनी आपल्या भाषणादरम्यान संजय राऊत यांनी महाविकास आघाडी बनवण्यात कशी भूमिका बजावली याची आठवण संगमनेरकरांना सांगितली.

संगमनेर तालुक्यातील डीग्रस या गावात बुवाजी महाराज देवस्थानच्या हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्याला संजय राऊत यांनी हजेरी लावली. यावेळी मंदिरात दर्शन घेताना महाराजांनी संजय राऊतांना इच्छा व्यक्त करण्यास सांगितले. मात्र संजय राऊतांनी त्यावेळी कोणतंही भाष्य केलं नाही.



मात्र नंतर जाहीर कार्यक्रमात संजय राऊतांनी आपल्या भाषणात या प्रसंगाचा उल्लेख केला. संजय राऊत म्हणाले, ङ्ग्घदेवस्थानच्या महाराजांनीच शिवसेना चिन्ह आणि नाव याचा निकाल तुमच्या बाजूने लागावा असं साकडे देवाला घातल्याचं मला सांगितलंङ्ग्घ दरम्यान, यावेळी संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही तोफ डागली. ङ्ग्घएकनाथ शिंदे यांनी श्रीनगरमध्ये रक्तदान केलं. मात्र मी स्वतः पत्र लिहून गद्दारांचं रक्त सैन्यासाठी वापरू नका असं आव्हान करणार आहेङ्ग्घ असं संजय राऊत म्हणाले. संगमनेर मतदारसंघात बाळासाहेब थोरात यांचा पराभव झाला याचं शल्य केवळ मलाच नव्हे तर महाराष्ट्राला आहे असं देखील संजय राऊत म्हणाले.

६ मी गेली चार पाच वर्षे सातत्याने इथे येतो. मला जेव्हा निमंत्रणाचा फोन आला तेव्हा मी दिल्लीत राहुल गांधींसोबत पोलिसांच्या ताब्यात होतो. इथली माणसं गोड आहेत, आग्रह मोडता येत नाही. या देवस्थानावर माझी श्रद्धा बसली आहे.

---

''त्यातलं एक चित्र, बाई. हात नसलेली, गुडघे गळ्यात घेऊन बसलेली बाई. हात नसतानाही तिची छाती तिने गुडघ्यात रेलली होती. पायात मोठमोठे कडे आणि त्या कड्याना बांधलेल्या साखळ्या. साखळ्यांचं दुसरं तोंड खुंटीला. खुंटीवर अनेक हात. बाईचे प्रचंड मोठे केस. डोळे अगदी खोलवर निस्तेज. कुठल्यातरी मोठ्या सुईने शिवलेले तिचे ओठ आणि डाव्या बाजूला ओठावरून खाली ओघळ-णारी सुई आणि दोर. आजूबाजूला प्रचंड गर्दी. दगडांची, खिळ्यांची, निवडुंगांची. शेजारीच एक दाट उसळेलेला समुद्र.'' हा परिच्छेद आहे

संहिता राजन यांच्या ''चल गं सये वारुळाला ''या कथासंग्रहातील एका कथेतील. स्वातंत्र्याला पारख्या झालेल्या बुद्धिमान स्त्री-चे समाज रचित कोंडलेपण, बांधलेपण, जखडलेपणाची जाण या प्रतिकात्म परिच्छेदात आहे. तिच्या स्वातंत्र्याला बांध घालणाऱ्या समाजसाखळ्यांचे हे कथन आहे. संहिता राजन यांचा ''चल गं सये वारुळाला ''हा कथासंग्रह अलीकडेच शब्दालय प्रकाशनाने प्रकाशित केला आहे.


या दशकात मराठीतील तरुण लेखिका लोकविलक्षण अशा कथा लिहीत आहेत. हे मराठी वाडमयाचे सुचिन्ह म्हणावे ला-गेल. या लेखिकानी सर्व तऱ्हेची आविष्कार मोकळीकता मराठी कथेत आणली आहे. समाज व पुरुष लेखनसंकेत नियंत्रणाच्या ही कथा पुढे जाते आहे. आणि जीवनानुभावाच्या वेगळ्या अशा वाटा धुंडाळत आहे. या पैकीच एक संहिता राजन. यापूर्वी त्यांच्या दोन तीन कथा व काही ललित तुकडे काही नियतकालिकात वा-चले होते.

एक वेगळे कथनजग त्यांच्या कथाचित्रणात आहे. नागर आणि ग्रामीण अशा दोन्ही चित्रणप्रदेशाची ही कथा आहे. केवळ एवढेच तिचे वर्णन अपुरे आहे. कारण गेल्या दोन दशकात जो नागर जीवनात नवा समाज आकारला आला तो म्हणजे कार्पोरेट जग. या कार्पो रेट जगातील तरुण तरुणीचे जग या कथेत केंद्रवर्ती आहे. त्यातही तरुण स्त्रियांच्या जगाने व्यापलेली ही कथा आहे. कार्पोरेट जगातील तरुणी आणि तरुणाच्या जगातील नातेबंध त्यातील पडझड आणि कोसळण्याच्या या कथा आहेत. नवे जग वेगाने बदलेले आहे. या बदलगतीत नात्यांची फेरफार झाली आहे . होते आहे. नाती अस्थिर झाली आहेत. किंबहुना अस्थिर प्रेम हा या जगाचा परवलीचा शब्द बनला. या अस्थिर प्रेमाने आणि करिअर शोधाने या कथनसृष्टीला वेगळी परिमाणे प्राप्त करून दिली आहेत.

कार्पोरेट जगातील दांभिकपणा, अस्थिरता, सर्व प्रकारच्या दैहिक भोगवाद, नशाधुंदी आणि पराकोटीची निराशा या जाणी-वेने आकाराला आलेली ही कथा आहे. नव्या पिढीच्या कॉर्पोरेट क्षेत्रातील अनुभवविश्वाचे तिथल्या जीवनशैलीचे अनोखे असे तपशील चित्रण या कथांत आहे. अर्थात त्यांची हे जग न्याहाळण्याची पद्धत ही स्त्री पुरुष यांच्यातील परस्परसंबंध आणि नात्यांमधील अनुबंध शोधणे ही आहे. अष्णा, जसप्रीत, रिची, पीहू, रिया या नावावरून देखील या कथाचित्रणाचा परिसर लक्षात येईल. या जगातील सर्व प्रकारची स्वैरता, स्वातंत्र्याच्या अतिरेकातून येणारे वैफल्य, एकांगी आग्रही स्वभाव यातून या कथेला विविध परिमाणे लाभली आ-हेत. नव्या पिढीतील रिलेशनशीप हा या कथेचा गाभाविषय आहे. नात्यांमधील दुरावा आणि अंतर या त्यास खास असा संदर्भ आहे. ब्रेकअपच्या दुराव्यातून आलेल्या वैफल्य आणि परात्मभावाची ही कथा आहे. या नव्या गती जगा-तही स्त्रीच्या वाट्याला आलेले एकाकीपण या कथेत आहे. ते गडद स्वरूपाचे आहे. नात्यांमधील दुराव्यामुळे व स्वतःच्याही अनाठायी आग्रहामुळे वाट्याला आलेल्या एकाकीपणाच्या या कथा आहेत. बऱ्याच कथेत स्त्रीच्या वाट्याला हरवलेपण आले आहे. स्त्रिया शून्यात डोळे लावून बसतात अशी अनुभवकथाचित्रे या कथांत आहेत. हा परात्मभाव सामाजिक चौकटी व नातेसंबंधातील बेबनावामुळे आला आहे. आधारहीन भरगच्च अंधाराची ही कथाचित्रे आ-हेत. ''असंख्य लोक अवतीभवती असूनही तिच्या भोवताली एकटेपणाचा काळोख होता.'' त्यामुळे स्त्री जीवनातील अनेकविध प्रकारच्या एकाकीपणाच्या गडद काळोखीपणाच्या या कथा आहेत.

राजी सारखी ड्रगच्या नशेच्या

**पुस्तक परिक्षण**




**चल गं सये वारुळाला**
**संहिता राजन**

आहारी गेलेल्या तरुणीचे हृदय हेलावणारे चित्र एका कथेत आहे.

संहिता राजन यांच्या कथेत ग्रामीण भागातील सरंजाम कुटुंबातील स्त्रियांच्या एकाकीपणाचे व चौकटी नियंत्रणाचे चित्र आहे. '' मोठ्या घराण्यात जन्माला येणे हा तर बाईचा मोठा गुन्हा '' आणि ''रीत हाय या घराची''या पारंपरिक जाणिवेने स्त्रियांचे कोंडलेपण अधिक गहिरे आणि कुचंबणचे झाले आहे. स्त्रीच्या स्वातंत्र्याला मर्यादा घालणाऱ्या चौकटीचे चित्रण या कथांत आहे. कॉर्पोरेट जगा-तील सरस अशा कथा लिहिणाऱ्या संहिता यांच्या कथेत ग्रामीण जी-वनाचे व तेथील स्त्रीजीवना-चे लोकविलक्षण कथन आहे. ''भ्रमिष्टाचे क्षण क्षण '' ही कथा या संग्रहातील लोकविलक्षण कथा आहे. एका किशोरवयीन मुलीच्या नजरेतून घरातीलच गतविस्मृत इंदुबाईची गोष्ट सांगितली आहे. इंदूकथेचा हा थरारक पाठलाग आहे. धाडशी संवेदनशील, हुशार कलावंत मनाच्या इंदूचे आयुष्य कुटुंबात कोमेजते. ती घुसमटून जाते. तिच्या आयुष्याची होरपळ होते. पारंपरिक समाज निर्बंधाची ती बळी ठरते. तिचे इच्छेविरुद्ध एका विधुराशी लग्न लावून दिले जाते. ती क्रमशः कोमेजून जाते. माहेर आणि सासरच्या काचात अडकलेल्या स्त्रीची ही व्यथाकथा आहे. ''भरजरी पदरात आणि खोल हसण्यात लपवलेल्या दुःखाचा लाग शोधणारी ही कथा आहे. हळूहळू ती इच्छामरणासारखे विझून जाते. चहूबाजूंनी स्वातंत्र्य आणि इच्छा हिरावलेल्या तरुणीची ही शोकांत दुःखकथा आहे. ती विलक्षण भावरूपत्वाने कथन केली आहे. तरुणपणीच समाज कुटुंब चौकटीच्या तथाकथित नियमांना बळी गेलेल्या आत्मजाची ही शोधकथा आहे. छतावरील सापाचे विहरणे आणि इतरही सर्पस्वप्नांनी कथानुभवास प्रतिकात्मता प्राप्त करून दिली आहे. ही कथा एक व्याकुळ करुणा स्मृतीकथन आहे. ही कथा या दशकातील मराठीतील सर्वोत्तम कथांपैकी एक कथा आहे.

या संग्रहात काही सामाजिक विशेषता हिंदू मुस्लिम प्रश्नासंबंधीची ''इज्तिरार'' या नावाची कथा आहे. कथेत हिंदू मुस्लिम जीवनसंबधी तणावचित्रे आहेत. हे तणाव बदलत्या भारतीय मानसिकतेचे द्योतक आ-हेत. वर्तमानात हिंदू मुस्लिम प्रश्न कंगोरे तीव्र आणि संवेदनशील झाले आहेत याचे ही कथा सुस्पष्ट असे उदाहरण आहे. कट्टर अशा धार्मिक असहिष्णुतेमुळे एका हिंदू तरुणाच्या मृत्यूमुळे इमामावर मोठी आपत्ती कोसळते, त्यावर बहिष्कार टाकला जातो.याचे बोलके चित्र या कथेत आहेत. बेबस, लाचार, मजबूर तरुणाच्या मृत्यूचे आणि त्यानंतर उद्भवलेल्या असहिष्णुतेचे कथेत चित्र आहे.

या कथेचा रूपबंधही वेगळ्या वाटा धुंडाळणारा आहे. वर्तमानातील तरुण तरुणांची ही भाषा आहे. कार्पोरेट जगातील बहुमिश्रित भाषा आहे. ती एकाच वेळी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेची सहजमिसळणीची ही भाषा आहे. क्रियोल भाषेचा सर्जक वापर या कथेत आहे. काही कथेत पानेच्या पाने सफाईदार हिंदी भाषेतील रूपे आहेत. या कथेचे एक वैशिष्ट्य म्हणजे ही कथा ताणनाट्याची कथा आहे. कथेत अनेक प्रकारच्या आकस्मिक उद्भवलेली ताणचित्रे आहेत आणि ती गडद आहेत. ती कथेला वेग आणि वेगळ्या दिशा देतात. या कथेचा एक वेगळेपणा म्हणजे कथा सादरीकरणातील मोकळीकता. ड्रगसेवित तरुणांपासून, महानगरा-तील अकल्पित स्त्री पुरुष संबंधांचे चित्रण ते अमानवी सेक्सवर्कर सारख्या जीवनानुभवाच्या अमानुष अनुभव संवेदनांच्या या कथा आ-हेत. स्त्री पुरुष नात्यातील खाजगी अनुभव प्रदेश त्यांनी विवेकी भाषेत आणि धाडसाने कथन केल्या आहेत.

एकंदरीत एक वेगळे असे कथाभान असणारी ही कथासृष्टी आहे. मराठी कथेस अपरिचित असणाऱ्या अनुभवप्रदेशाची ही कथा आहे. वर्तमान स्त्री जी-वनाची ही कथा आहे. आधुनिक काळातील स्त्रीच्या एकाकीपणाची आणि दुःखाची कथा आहे. तिच्या परात्मभावाची कथा आहे. स्त्रियांच्या निर्बंधाची कथा आहे. कॉर्पोरेट जगातील तरुण तरुणीच्या रिलेशनशिपची ही कथा आहे . नागर ते ग्रामीण असा तिचा पैस आहे. स्त्रियांमधील ''हतबलता माणसाला नुसते अगतिक नाही तर गुलाम बनवते'' या भावविश्वाची ही कथा आहे. मराठीतील या नव्या कथाप्रदेशाचे स्वागत.

**– रणधीर शिंदे**

---

**पान १ वरून**

### देशभरात मातृभूमीचं जयगान गायलं जात आहे : मोदी

डॉ शामा प्रसाद मुखर्जी यांची १२५ वी जयंती, ते संविधानासाठी बलिदान देणारे पहिले महापुरुष

आज कलम ३७० ची भिंत पाडून एक देश एक संविधान हे स्वप्न साकारुन मुखर्जींना श्रद्धांजली वाहिली

ऑपरेशन सिंदूरच्या वीर जांबाज सैनिकांना सलाम करण्याचं भाग्य मला मिळालं, त्यांनी शत्रूंना कल्पनेपलिकडची शिक्षा दिली

पहलगाममध्ये सीमेपलिकडून येणाऱ्या दहशतवाद्यांनी धर्म विचारुन-विचारुन आमच्या लोकांना मारलं, पत्नीच्या समोर पतीला मारलं, मुलांच्या समोर वडिलांना संपवलं, संपूर्ण हिंदुस्थानात आक्रोश, विश्व हादरलं, ऑपरेशन सिंदूर हा याच आक्रोशाची अभिव्यक्ती होती

आम्ही सैन्याला पूर्ण स्वातंत्र्य दिलं, की रणनीती, पद्धत, वेळ आणि लक्ष्य त्यांनी ठरवावं, अशी मुभा दिली, आपल्या भारतीय सैन्याने ते केलं जे दशकभरात कोणाला जमलं नाही

शत्रूच्या गोटात शेकडो किलोमीटर घुसून मारलं, पाकिस्तानची झोप अजूनही उडालेली, दहशतवादी आणि दहशतवाद्यांचे पोशिंदे वेगवेगळे नाहीत, त्यांचं इतका नुकसान झालंय की रोज नवनवे खुलासे होत आहेत

सिंधू पाणीवाटप करार अन्यायकारक होता, हे आता देशाला समजलंय, त्या पाण्यावर आता केवळ भारताचा हक्क, रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही

पाकिस्तानच्या अण्वस्त्र हल्ल्याच्या धमक्यांना आता भारत भीक घालणार नाही

विकसित भारत म्हणजे आत्मनिर्भर भारत, आपलं सामर्थ्य कायम राखण्यासाठी आत्मनिर्भरता हवीच

इतरांवर अवलंबून असलेल्या देशांच्या स्वातंत्र्यावरच प्रश्नचिन्ह आहे

आण्विक ऊर्जा क्षेत्र आत्मनिर्भर करण्यासाठी खासगी उद्योगांसाठी खुलं

अवकाश संशोधनातही भारत आत्मनिर्भर होतोय, गगनयान हे त्याचंच उदाहरण, महत्त्वाच्या खनिजांच्या शोध मोहिमांसाठी प्रयत्न

मेड इन इंडिया लढाऊ विमानांसाठी भारतीय जेट इंजिन तयार व्हायला हवं

कोव्हिड काळात आपण इतरांवर अवलंबून होतो, आम्ही तरुणांना आवाहन केलं की आपली वॅक्सिन असावी, देशाने करुन दाखवलं

मुद्रा योजनेतून व्यवसाय उभा करत आत्मनिर्भर होत आहे, स्वतःच्या पायावर उभं राहत इतरांनाही बळ दिलं.

यूपीआय प्लॅटफॉर्मबाबत जगाला भारताने आदर्श दाखवून दिला, जगभर भारतीय एमएसएमईंचा डंका

ती पिढी स्वतंत्र भारतासाठी खपली, ही पिढी समृद्ध भारतासाठी खपली पाहिजे

भारत आपल्या सर्वांचा, राजकीय पक्षभेद विसरुन सर्वांना आवाहन आहे की व्होकल फॉर लोकल या मंत्राचा प्रसार करा

भारताला बळ देणाऱ्या उत्पादनांना सामर्थ्य द्या, इन्फ्लूएन्सरना आवाहन

मला दीर्घकाळापासून सरकार चालवण्याचा अनुभव, चढउतार पाहिले, इतरांची रेषा पुसण्यात ऊर्जा वाया घालवू नका, आपल्या पूर्ण ताकदीने स्वतःची रेषा मोठी करायची आहे.

देशातील नागरिकांना तुरुंगात डांबणारे अनावश्यक कायदे रद्द करण्याची तयारी करत आहे

येत्या दिवाळीत मोठी आनंदवार्ता मिळणार, आठ वर्षांपासून जीएसटी पद्धतीत सुधारणा करत आहोत, नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म हा येत्या दिवाळीत आणत आहोत, यातून मोठ्या प्रमाणात कर सवलती मिळणार

तीन कोटी महिलांना लखपती दीदी करण्याचा संकल्प वेळेआधीच पूर्ण होणार, दोन कोटी महिलांनी आधीच लक्ष्य पूर्ण केलंही

खेलो भारत योजनेच्या अंतर्गत क्रीडा धोरण राबवणार, खेळांच्या विकासासाठी इको सिस्टीम तयार करणार

महात्मा ज्योतिबा पुले यांचा २०० वा जयंती सोहळा सुरु होणार, त्यांचे विचार आम्हाला प्रेरणादायी आहेत.

स्थूलत्वाच्या विरोधातील लढाई जिंकण्यासाठी मदत करा, तेल दहा टक्के कमी वापरा

मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला, भाषा जितक्या समृद्ध होतील, तितकं सामर्थ्य मिळेल

शंभर वर्षांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म, राष्ट्रनिर्माणाच्या संकल्पात भारतमातेच्या कल्याणाचं लक्ष्य बाळगत अनेकांचं बलिदान, जगातील सर्वात मोठा एनजीओ, शंभर वर्षांचा समर्पणाचा इतिहास, सर्व स्वयंसेवकांना आदरपूर्वक नमन

### राज्यात पावसाचे धूमशान

आज राज्यातील जिल्ह्यांना हाय अलर्ट देण्यात आला आहे. हवामा विभागाने दिलेल्या माहितीनुसार कोकणातील रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट आहे, तर मुंबई, जिल्ह्यात पालघर, नवी मुंबई आणि ठाणे या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

### महाराष्ट्रात दहिहंडी उत्साहात साजरी

जखमी होण्याच्या घटना घडल्या. एकूण ९५ गोविंदा जखमी झाले. त्यापैकी १९ जणांवर उपचार सुरू आहेत, तर किरकोळ दुखापत झालेल्या ७६ गोविंदांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. यामध्ये २ गोविंदा गंभीर जखमी आहेत. दरम्यान, दहीहंडीत सहभागी असलेल्या एका गोविंदाचा मृत्यू झाला असून, कावीळने त्रस्त असलेल्या एका १४ वर्षीय मुलाचाही मृत्यू झाला आहे.

एकाच दिवसात तिसऱ्यांदा १० थरांचा विक्रम!

सकाळी घाटकोपर येथे मनसे गणेश चुक्कल आणि अरविंद गिते मित्र परिवार आयोजित दहीहंडीमध्ये जय जवान पथकाने १० थरांची दहीहंडी रचून उपस्थितांना थक्क केले. यानंतर रात्री ठाण्यातील प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती प्रतिष्ठान आयोजित दहीहंडीत पुन्हा एकदा १० थरांचा विक्रम घडवला. इतक्यावर न थांबता लगेचच मनसेचे नेते अविनाश जाधव यांच्या ठाण्यातील दहीहंडीतही जय जवानने तिसऱ्यांदा १० थरांची दहीहंडी रचून अनोखी किमया दाखवली. त्यामुळे जय जवान पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कोकण नगर गोविंदा पथकाची १० थरांची सलामी

ठाण्यातील प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती प्रतिष्ठानच्या दहीहंडीमध्ये कोकण नगर गोविंदा पथकाने (२०२५) १० थरांची सलामी दिली. दहीहंडीची थरारकता, कोकण नगर गोविंदा पथक आणि जय जवानच्या हॅट्रिक विक्रमामुळे उत्सव अविस्मरणीय ठरला असला तरी, झालेल्या अपघातामुळे शोककळाही पसरली आहे. एकीकडे जय जवानचा विक्रम आणि दुसरीकडे झालेल्या दुर्घटना, अशा मिश्र वातावरणात यंदाची दहीहंडी संपन्न झाली.

### 'मांसविक्री बंद'चा निर्णय सरकारचा नाही!

दिला होता, असेही त्यांनी सांगितले.

कल्याण डोंबिवली महापालिकेने १५ ऑगस्टला मांस विक्री बंद ठेवण्याचा आदेश काढल्याने राज्यातील वातावरण तापले आहे. विरोधी पक्षांकडून या निर्णयाचा जोरदार विरोध केला जात असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या मुद्यावरून सरकारवर टीका केली आहे. या पार्श्वभूमीवर आज प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारने मांस विक्री बंदीचा कुठलाही निर्णय घेतला नसल्याचे स्पष्ट केले.

हा निर्णय १२ मे १९८८ रोजी तत्कालीन काँग्रेस सरकारने घेतला होता आणि त्यानंतर तो लागू झाला आहे. या निर्णयानुसार प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, गांधी जयंती, रामनवमी, महावीर जयंती या दिवशी कत्तलखाने बंद ठेवण्याचा अधिकार महापालिकेला देण्यात आला आहे. यापूर्वी महाविकास आघाडी सरकारच्या काळातही कत्तलखाने आणि मांसाहार विक्री दुकाने बंदचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, यावरून वादंग निर्माण करण्याचा मुर्खपणा काहीजण करत आहेत. शाकाहारी खाणाऱ्यांना नंपुसक म्हणायला लागले आहेत, असेही फडणवीस यांनी सांगितले.

दरम्यान मुंबईतील कबुतरखाने तुर्तास बंद ठेवण्याचे आदेश न्यायालयाकडून देण्यात आले आहेत. परंतु यावर जैन समाजाने आक्रमक भूमिका घेतली आहे. यावरही फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. लोकांचे आरोग्य महत्त्वाचे आहे. जो आस्थेचा विषय आहे, त्याची काळजी घेवू शकतो. वस्ती नाही तिथे आपण खाद्याची व्यवस्था करू शकतो. हा वादाचा विषय नाही, समाजाचा विषय आहे. समाजाचे आरोग्य आणि समाजाची आस्था हे दोन्ही विषय आम्ही सोडवू, एका समाजाविरोधात दुसरा समाज उभा केला जात आहे. काही लोकांना यातही महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संधी दिसते. समाजात भांडण लावण्याचा प्रयत्न होतो. पण ही मुंबईची प्रवृत्ती नाही. महाराष्ट्र इतका मजबूत आहे की त्यामुळे तो हलेल आणि महाराष्ट्रात काही तरी घडेल, असा विचार कोणी करू नये. मागच्या काळात असे गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न झाले. मात्र त्याने काही होत नाही हे महाराष्ट्राने दाखवून दिले असल्याचे फडणवीस म्हणाले.

### त्या ६५ लाख लोकांची नावं जाहीर करा

का वगळण्यात आली. याची कारणंही सांगा, असे आदेश न्यायालयान आयोगाला दिले आहेत. प्रकरणातील पुढील सुनावणी २२ ऑगस्टला होणार आहे. गुरुवारी झालेल्या सुनावणी दरम्यान या न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांनी निवडणूक आयोगाला सुनावलं. बिहार लोकशाहीची जन्मभूमी आहे. मतदार यादीत पारदर्शकता गरजेची मआहे, असं बागची म्हणाल्या. मृत, विस्थापित, एकापेक्षा अधिक नोंदणी असलेल्या मतदारांची यादी थेट संकेतस्थळावर प्रसिद्ध का केली जात नाही? यामुळे सामान्य मतदाराला दिलासा मिळेल आणि नकारात्मक भावना संपुष्टात येतील. असं न्यायमूर्ती म्हणाल्या.

निवडणूक आयोगाची आकडेवान १ एप्रिल २०२५ पर्यंत बिहारमध्ये एकूण ७ कोटी मतदार होते. यातील ७. २४ कोटी लोकांनी अर्ज भरा तर ६५ लाख नावं ड्राफ्ट लिस्टच्या बाहेर गेली. यातील लाख मृत लाख मृत घोषित करण्यात आले आहेत, अशी आकडेक आयोगाचे वकील राकेश द्विवेदी यांनी मांडली. ड्राफ्ट रोलम कोणाचंही नाव विनाकारण हटवण्यात आलेलं नाही. ज लोकांनी केवळ अर्ज भरले आहेत, त्यांना ऑगस्टम पुरावे, दस्तावेज सादर करावे लागतील, असं द्विवेदी यां न्यायालयाला सांगितलं.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय-प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD




- Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
- State-of-the-Art eBook Readers
- Advanced Security and Technology
- Intelligent Search and Realistic Viewing Experience
- Expansive Content Library
- Global Accessibility and Multi-Publisher Platform
- Tailored Solutions for Institutes and Libraries
- Interactive Learning with General Knowledge Software
- Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 I +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# नगर-पुणे रेल्वे मार्गासाठी प्रयत्न : मुख्यमंत्री

## नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा पंतप्रधानांच्या हस्ते दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे शुभारंभ

**नागपूर** : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला. या निमित्ताने येथील मध्यवर्ती रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक आठवर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, नगर ते पुणे असा थेट मार्ग तयार करण्यात आला तर प्रवासाचे अंतर कमी होईल व वेळही वाचेल. पुढील काळात याबाबत नियोजन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री यांनी कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.

व्यवस्थापक आमदार मोहन मते, कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीणा, विभागीय रेल्वे विनायक गर्ग यांच्यासह मध्य रेल्वेचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे कालनागपूर (अजनी) पुणे गाडीला हिरवा झंडा दाखवून मार्गस्थ केले. तसेच याच कार्यक्रमात बेंगळुरू-बेळगाव आणि कटरा-अमृतसर वंदे भारत एक्सप्रेस या गाड्यांचाही शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर प्रसार माध्यमांशी वार्तालाप करताना मुख्यमंत्री म्हणाले, नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेस ही गाडी देशातील सर्व वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांमध्ये सर्वाधिक अंतर पार करणारी गाडी आहे. सध्या नगर-दौंड मार्गे पुणे येथे जाणाऱ्या गाडीला शंभर ते सव्वाशे किलोमीटरचा फरक पडतो. त्यावर उपाय म्हणून रेल्वे मंत्रालयाला असे सुचवण्यात आले आहे की, नगर ते पुणे पुणे असा थेट मार्ग तयार करण्यात आला तर प्रवासाचे अंतर कमी होईल व वेळही वाचेल. पुढील काळात याबाबत नियोजन करण्यात येईल. छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर व पुणे हा औद्योगिक पट्टा असून येथील विकास साधायचा तर रेल्वेचे नवीन मार्ग निर्माण करणे गरजेचे आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर ते पुणे नवीन एक्सप्रेस वे निर्माण करण्यात येणार असून त्याच्या राईट ऑफ वेमध्ये या रेल्वे मार्गाचा विचार केल्यास प्रवासाचे अंतर अधिक कमी करता येणे शक्य आहे, असे त्यांनी सांगितले.



### मनमाड, कोपरगाव, अहिल्यानगर, दौंड येथे थांबा

नागपूर (अजनी) पुणे वंदे भारत एक्सप्रेसमुळे नागपूर ते पुणे हे अंतर जवळपास बारा तासांत कापणे शक्य होणार असून यामुळे यापूर्वी लागणारा प्रवासाचा अधिकचा वेळ वाचणार आहे. अजनी-पुणे वंदे भारत एक्सप्रेस ही गाडी नागपूर ते पुणे प्रवासादरम्यान वर्धा, बडनेरा, अकोला, मुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहिल्यानगर आणि दंडि येथील स्थानकावर थांबून दॉड कॉर्डलाइन मार्गे पुण्याला पोहोचणार आहे.

## नगरमध्ये आता कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित व्हॉट्सअॅप चॅनेल

### पालकमंत्री विखे; स्वातंत्र्यदिनानिमित्त यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा

**अहिल्यानगर** : नागरिकांशी थेट संवाद साधून विविध योजनांचा लाभ देणाऱ्या, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित जिल्हा प्रशासनाच्या तीन नाविन्यपूर्ण डिजिटल उपक्रमांची सुरुवात पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते शुक्रवारी स्वातंत्र्यदिनी करण्यात आली.

नागरिकांशी थेट व तातडीचा संवाद साधून योजना अंमलबजावणीत पारदर्शकता वाढवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय-संवाद सेतू यामार्फत विविध विभागांचे सेवा आवश्यक कागदपत्रांची यादी, नजीकच्या सेतू केंद्रांची माहिती कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साह्याने व्हाट्स ॲपवर मिळणार आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत व्हाट्सअॅप चॅनेल सुरू करण्यात आले आहे. व्हाट्सअॅप चॅनल - आपल्या शिवार मार्फत प्रशासनाचे अद्ययावत माहिती, आपत्तीविषयक सूचना तसेच राज्य सरकारच्या उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे, सामाजिक न्याय विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या प्रगतीची माहिती लाभार्थ्यांना मोबाईलवर पाहण्याची सुविधा उपलब्ध होईल. त्यामुळे वेळ व खर्च वाचेल तसेच पारदर्शकता वाढेल अशी अपेक्षा पालकमंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली. दरम्यान जिल्हा पोलीस मुख्यालयातील कवायत मैदानावर स्वातंत्र्यदिनानिमित्त पालकमंत्री विखे यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला.

## 'जनाची नाही तर मनाची तरी ठेवा...'

**धाराशिव** : जलसंपदा मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी महायुतीचा घटक असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षांना म्हणजेच अजित पवारांवर जोरदार टीका केली आहे. अजित पवार जनाची नाही तर मनाची तरी ठेवा, असं म्हणत राधाकृष्ण विखे पाटलांनी अर्थमंत्री अजित पवारांवर जोरदार टीका केली आहे.

## ५०० कोटींची कृषी यांत्रिकीकरण प्रोत्साहन योजना ठरणार शेतकऱ्यांसाठी वरदान

**अहिल्यानगर** : कृषी यांत्रिकीकरण प्रोत्साहन योजना ही महाराष्ट्र सरकारने २०२५ च्या अर्थसंकल्पात छ कोटींच्या निधीने सुरू केलेली एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदी करताना आर्थिक बोजा कमी होईल आणि शेतीचे काम जलद, परवडणारे आणि उत्पादक बनेल. विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्यांना, ज्यांच्यासाठी आधुनिक यंत्रसामग्री खरेदी करणे कठीण आहे, याचा मोठा फायदा होणार आहे.

ही महाराष्ट्र सरकारने २०२५ च्या अर्थसंकल्पात छ कोटीच्या निधीने सुरू केलेली एक महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदी करताना आर्थिक बोजा कमी होईल आणि शेतीचे काम जलद, परवडणारे आणि उत्पादक बनेल. विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्यांना, ज्यांच्यासाठी आधुनिक यंत्रसामग्री खरेदी करणे कठीण आहे, याचा मोठा फायदा होणार आहे. ही योजना महाराष्ट्रातील शेतीला यांत्रिकीकरणाकडे नेण्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे.


## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**


## महाराष्ट्रात १५ हजार पोलिसांची भरती

**मुंबई** : राज्य पोलीस दलातील शिपायांची सुमारे १५ हजारहून अधिक पदे भरण्यात येणार आहेत. त्यासाठी सन २०२४-२५ च्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेस मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या भरतीमध्ये २०२२ आणि २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार असून भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

राज्याच्या पोलीस दलात सन २०२४ दरम्यान रिक्त असलेली आणि २०२५ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन ही भरती करण्यात येणार आहे. पोलीस शिपाई आणि कारागृह शिपाई ही पदे गट क संवर्गातील आहेत. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया त्या-त्या जिल्हास्तरावरून राबविण्यात येणार असून त्यासाठी ओएमआर आधारित लेखी परीक्षा घेण्यात येईल.

भरतीसाठी अर्ज मागवणे, अर्जाची छाननी, त्यावर प्रक्रिया तसेच उमेदवारांची शारिरीक परीक्षा, त्यातून पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा यासाठी अनुषांगिक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार प्रशिक्षण आणि खास पथके विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालकांना देण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलातील शिपाई संवर्गाची पदे अत्यंत महत्त्वाची आहेत. पदे रिक्त राहिल्यास, पोलिसांवरील कामाचा ताण वाढतो. पोलीस दल आणि कारागृहातील स्थिती सुधारण्यासाठी उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी ही पदे वेळेत भरली जावीत, असे निर्देश दिले आहेत. लोकप्रतिनिधी तसेच विधिमंडळातील चर्चेतही लोकप्रतिनिधींकडून ही पदे तातडीने भरण्याची मागणी करण्यात आली आहे.

## भावकीकडे लक्ष दिलं म्हणूनच तू आमदार झाला : पवार

**सांगली** : सांगलीतील इस्लामपूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार या काका-पुतण्यामध्ये चांगलाच कलगीतुरा रंगला.

अजितदादा आता गावकीकडे लक्ष देत असताना त्यांचं भावकीकडे दुर्लक्ष होत असल्याचा टोला रोहित पवारांनी लगावला. पुतण्याच्या या वक्तव्याचा अजित पवारांनी समाचार घेत त्यांना २०२४ च्या कर्जत-जामखेडच्या विधानसभा निवडणुकीत पडद्यामागून केलेल्या मदतीची जाहीरपणे आठवण करून दिली.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021